| MHBI060015552013 | नि. दि. दावा क्र. | २४६/२०१३ |
|---|---|---|
| | पांडुरंग -वि- शशीकलाबाई | |
| | निशाणी क्र. | १२९ |

## प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची शपथेवर जबानी

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **नाव** | : | विजय गंगाराम महापुरे, | | | |
| **वय** | : | ५० | वर्ष | **धंदा** | नौकरी,निमतानदार, |
| **राहणार** | : | अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. | | | |

**प्रतिवादीतर्फे पुढील सरतपास अधिवक्ता श्री. एम. डी. मुदगलकर यांच्यामार्फत सुरु** -

मी सन २०२१ पासुन अंबाजोगाई येथील उप अधिक्षक भुमी अभिलेख यांच्या कार्यालयात निमतानदार या पदावर नौकरीस आहे. मुंबई एकत्रीकरण व तुकडेबंदी कायद्यांतर्गत तरतुदींनुसार जमिन हस्तांतरणामध्ये तुकडेबंदी कायद्याचा भंग झाला आहे किंवा कसे हे पाहण्याचे काम भुमी अभिलेख कार्यालयाचे आहे. आज रोजी मी साक्षकामी येते वेळी माझेसोबत मला प्रस्तुत प्रकरणात साक्ष देणेकामी प्राधीकृत केल्याबाबत पत्र, उपअधिक्षक भुमी अभिलेख यांनी अधिक्षक सहदिवाणी न्यायालय यांना दिलेले दिनांक ११/०३/२०२६ रोजीचे पत्र व त्यासोबत जमिन एकत्रीकरण कायदा सन १९८२ मधील प्रपत्र ब ची प्रत आणलेली आहे. मी ते न्यायालयात दाखल करण्यास तयार आहे. साक्षीदाराने **निशाणी क्रमांक १३० वरील अर्ज व १३१** वरील वर्णन यादीसोबत उपरोक्त दोनही दस्त न्यायालयात दाखल केले. प्रस्तुत साक्षीदारास उपअधिक्षक भुमी अभिलेख यांनी प्रस्तुत प्रकरणात प्राधिकृत केलेल्या पत्रास **निशाणी क्र. १३२** देण्यात आला. प्रस्तुत साक्षीदाराने जा.क्र. १६४९ दिनांक ११/०३/२०२६ उपअधिक्षक यांनी अधिक्षक सहदिवाणी न्यायालय अंबाजोगाई यांना दिलेले पत्र दाखल करण्यात आले आहे त्यास **नि.क्र. १३३** देण्यात आला. सदर दोन्ही पत्रांवर उपअधिक्षक भुमी अभिलेख यांच्या सहया आहेत.

प्रश्नः अंबाजोगाई तालुक्यासाठी तुकडेबंदी कायद्यांतर्गत जिरायत व बागायती जमिनीसाठी सन १९९८ ते २००२ या कालावधीकरीता स्टॅन्डर्ड एरीया किती आहे ?

उत्तरः जिरायती क्षेत्रासाठी २ एकर म्हणजे ८० गुंठे व बागायती क्षेत्रासाठी २० गुंठे असा स्टॅन्डर्ड एरीया आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलट तपास वादींतर्फे विधीज्ञ श्री. बी. ए. चौधरी यांच्या मार्फत**

मला प्रस्तुत प्रकरणात तुकडेबंदी कायद्यांर्तगत कागदपत्रे न्यायालयात घेऊन येण्याबाबत समन्स आले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी नि.क्र. १३१ मधील कागदपत्रांच्या यादीसोबत दाखल केलेल्या जमिन एकत्रीकरण योजनेसंबंधीचे पुस्तक १९८२ ची प्रत दाखल करण्यास कोणी प्राधिकृत केले त्याबाबतचे प्राधिकृत आदेश अथवा सही सदर पुस्तकावर नमुद नाही. (सदरचा पुस्तक हा वादीचे विधीज्ञांनी साक्षीदारास दाखवुन ते कोणी प्राधिकृत केले आहे त्यावर नमुद आहे काय असा प्रश्न विचारला. त्यावर प्रतिवादीचे विधीज्ञ श्री मुदगलकर यांनी असे कथन केले की, सदरचे पुस्तक हे साक्षीदारास दाखवले (रेफर) असल्याने सदर पुस्तकास निशाणी देण्यात यावी. एखादा दस्त साक्षीदारास दाखवला यावरुन तो दस्त पुराव्यात वाचता येतो अथवा तो सिध्द होतो अशी भारतीय पुरावा कायदा तसेच दिवाणी प्रक्रीया संहितेनुसार तरतुद नाही. त्यामुळे केवळ एखादा कागद साक्षीदारास दाखवला यावरुनच तो भारतीय पुरावा कायद्यामधील चौकटीमधुन पास झाला असा अर्थ होत नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या विधीज्ञांची हरकत फेटाळण्यात येते. सदर पुस्तकास निशाणी देता येत नाही).

प्रश्नः एखादा दस्त नोंदणीकृत झाल्यानंतर सदरच्या दस्तान्वये तुकडेबंदी कायद्याचा भंग झाला आहे किंवा कसे याबाबत तुमचे कार्यालयास निर्णय घेण्यासाठी किती दिवसांचा कालावधी कायद्यानुसार नमुद केलेला आहे ?

उत्तरः सांगता येणार नाही.

सन १९९८ ते २००२ या कालावधी दरम्यान अंबाजोगाई तालुक्यामध्ये एखाद्या नोंदणीकृत दस्तान्वये तुकडेबंदी कायद्याचा भंग झाला आहे किंवा कसे याबाबत आमचे कार्यालयाने कारवाई केली आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

तुकडे जोड तुकडेबंदी कायद्याचा भंग झाला असल्यास त्याबाबत कारवाई करण्याचा अधिकार भुमी अभिलेख कार्यालयास आहे हे मी सरतपासात नमुद केले आहे ते कोणत्या कायद्यांतर्गत भुमी अभिलेख कार्यालयास अधिकार दिले आहेत ते मला सांगता येणार नाही. तुकडेजोड तुकडेबंदी कायद्याचा भंग झाला असल्यास त्याबाबत आमचे भुमी अभिलेख कार्यालय काय कारवाई करते हे देखील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आज रोजी केवळ वरिष्ठांच्या आदेशान्वये कुठलीही माहिती न घेता न्यायालयात साक्षकामी आलेलो आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला प्रस्तुत प्रकरणाबाबत तसेच स्टॅन्डर्ड एरीयाबाबत वैयक्तीक माहिती नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SAGADE PRAVIN PRABHAKAR
Date: 2026.03.25 17:21:46 +0530

दिनांक: १८/०३/२०२६
अंबाजोगाई

(**प्रविण प्र. सागडे**)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अंबाजोगाई, जि. बीड.